वाचले :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

२. पत्र क्र.प्रशा/७/कावि/५५९/२०२० दिनांक २० ऑगस्ट, २०२०

३. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत

४. मा.महापालिका सभा ठराव क्र.७५५, दि. ०८/१०/२०२४

५. मा.आयुक्त सो यांचा दि. १० /१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/२/कावि/६६९/२०२४
दिनांक : १० /१०/२०२४

**विषय :- 'कार्यकारी अभियंता (विद्युत)' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर '**कार्यकारी अभियंता (विद्युत)**' या अभिनामाची पदे **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामधील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६, पदोन्नतीने नेमणूक करणे मधील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग - १ ची पदे पदोन्नतीने भरतांना, त्यांस शासनाची पुर्वमंजूरी आवश्यक राहील अशी अट नमुद आहे. सदरची अट शिथिल करण्याकामी उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये शासनास कळविण्यात आलेले आहे. परंतु महापालिका प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने व विभागाची आवश्यकता विचारात घेता '**कार्यकारी अभियंता (विद्युत)**' पद सद्यस्थितीत रिक्त ठेवणे योग्य नाही. सबब पदोन्नती पुर्व पदावरील सेवाज्येष्ठ अधिका-यांना पदोन्नती देणेकामी पदोन्नती समितीने शिफारस केली आहे.

तसेच पदोन्नती समितीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार **उपअभियंता (विद्युत)** या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार **खालील उपअभियंता (विद्युत)** संवर्गातील अधिकारी यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार '**कार्यकारी अभियंता (विद्युत)**' पदावर **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीत मा. महापालिका सभेच्या तसेच शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र | अधिकारी नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कावळे महेश दिगंबर | ज्येष्ठतेनुसार | जलशुध्दीकरण से. क्र. २३ (वि) |
| २ | दुर्गे संतोष हरिश्चंद्र | ज्येष्ठतेनुसार | ई क्षेत्रीय विद्युत |
| ३ | दळवी समीर हनुमान | ज्येष्ठतेनुसार | क क्षेत्रीय विद्युत |

मा.महापालिका सभेच्या आधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी ठराव क्र. ७५५, दि. ०८/१०/२०२४ अन्वये **उपरोक्त उपअभियंता (विद्युत)** संवर्गातील अधिकारी यांना '**कार्यकारी अभियंता (विद्युत)**' पदावर पदोन्नती देण्यास मान्यता दिलेली आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन आणि कनिष्ठ अभियंता (वि) पदाचे सेवाज्येष्ठते बाबत मे.उच्च न्यायालय येथे प्रलंबित दावा क्र. WP/२१४५/२००५ चे अधिन तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये

होणा-या निर्णयाच्या अधिन राहून **उपरोक्त उपअभियंता (विद्युत)** यांना '**कार्यकारी अभियंता (विद्युत)**'अभिनामाचे पदावर **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मान्यतेच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
*(शेखर सिंह)*
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, संबंधित अधिकारी
प्रत-

१) लेखा विभाग  २) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग  ४) सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

१०.१०.२४
सहा. आयुक्त (साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,